जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र.9819208279

प्रेसनोट **दिनांक ०५.०१.२०२६**

''अवैद्य अग्निशस्त्र बाळगणाऱ्या गुन्हेगारास अटक करून ०१ पिस्टल/अग्निशस्त्र व ०१ जिवंत काडतुस जप्त ''

मा.वरिष्ठांचे आदेशाने आगामी मनपा निवडणुकीच्या अनुषंगाने दि. ०१/०१/२०२६ रोजी परि. २, भिवंडी हद्दीत गुन्हे शाखा घटक - २, भिवंडी कडील अधिकारी व अंमलदार गुन्हेगार वॉच पेट्रोलींग करत असताना पोशि/१९९७ अमोल इंगळे यांना बातमी मिळाली की, ''एक इसम खदान रोड, शास्त्रीनगर, भिवंडी येथे टेम्पोजवळ आपल्या कब्जात अवैधरीत्या अग्निशस्त्र घेवुन बसलेला आहे'' अशी बातमी मिळाल्यानंतर वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. शितल राऊत यांनी मार्गदर्शन केल्याप्रमाणे सपोनि/मिथुन भोईर, पोउनि/रविंद्र बी. पाटील यांनी पथकासह खदान रोड, मोकळया मैदानात, हिंदु स्मशानभूमी जवळ, टेकडीच्या बाजुला, शास्त्रीनगर, भिवंडी, जि. ठाणे या ठिकाणी सापळा रचुन आरोपी अक्षय दिपककुमार वर्मा उर्फ शिवा वय २९ वर्षे, रा. रूम नं. ०२, अकबर शेठची चाळ, भाडयाची खोली, हिंदुस्तान बेकरीच्यामागे, आसबीबी रोड, हनुमान टेकडी, भिवंडी यास पंचासमक्ष ताब्यात घेतले. त्याच्या अंगझडतीमध्ये **०१ माऊझर/पिस्टल व ०१ जिवंत काडतुस** असे मिळुन आले. सदर आरोपी याच्याविरूद्ध भिवंडी शहर पोलीस ठाणे, भिवंडी गुन्हा रजि. नं. ०२/२०२६, शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ३, २५ सह महाराष्ट्र पोलिस अधिनीयमचे कलम ३७ (१), १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा तपास सपोउनि/सुनिल साळुंके, गुन्हे शाखा, घटक - २ भिवंडी हे करीत आहेत.

सदरची कामगिरी ही श्री.अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त, गुन्हे ठाणे शहर, श्री.शेखर बागडे, सहा. पोलीस आयुक्त गुन्हे शोध - १, ठाणे शहर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, घटक-२ भिवंडीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. शितल राऊत, सपोनि/मिथुन भोईर, पोउनि/रविंद्र बी. पाटील, सपोउनि/सुनिल साळुंके, सपोउनि/सुधाकर चौधरी, पोहवा/ निलेश बोरसे, सुदेश घाग, मपोहवा/ दक्षता सुतार, पोशि/ अमोल इंगळे, नितीन नंदीवाले व भावेश घरत यांनी केली आहे.

(शैलेश साळवी)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर